महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.
Website-https://mahaawaas.com
दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९ Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/PMAY-G-१/९८२ /२०२३ दिनांक -०६/०७/२०२३

**स्मरणपत्र — १**

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती.

**विषय :श्रीमंतांना घरकुल वाटप करणारे कर्मचारी व शासकीय अधिकारी यांचे सहकार्यानं गोरगरीब जनतेवर होत असलेल्या अन्याया संदर्भात कार्यवाही होणे बाबत अन्यथा दि.१४ ऑगष्ट पासुन विभागीय आयुक्तालय अमरावती येथे उपोषणास बसणे बाबत.**

संदर्भ : १) श्री. चंद्रशेखर नामदेव मेहरे यांचेकडील दि.२२.०६.२०२३ रोजीचा तक्रार अर्ज.
२) या कार्यालयाकडील पत्र क्र. जा.क्र./कावि/तक्रार/PMAY-G-१/८३०/२०२३, दि.२२.०६.२०२३

उपरोक्त संदर्भाधीन विषयान्वये, अर्जदार श्री.चंद्रशेखर नामदेव मेहरे (पत्रकार), तालुका प्रतिनिधी दैनिक महाराष्ट्र संकल्प व अन्य ११ उपोषण कर्ते व गावकरी यांचेकडील तक्रार अर्ज पुढील कार्यवाही करीता आपल्याकडे पाठविण्यात आला होता. परंतु, अद्यापपावेतो आपलेकडील अहवाल अप्राप्त आहे.

या अनुषंगाने आपल्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

सोबत - वरिलप्रमाणे

(नीलेश काळे)
**उपसंचालक**
**राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण**
**महाराष्ट्र राज्य**

**प्रत** :- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
२. उपसचिव, महाराष्ट्र शासन, ग्रामविकास विभाग, बांधकाम भवन यांना माहितीस्तव.

महाराष्ट्र शासन
**ग्राम विकास विभाग**
**संचालक, राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण यांचे कार्यालय**
४ था मजला, दक्षिण कक्ष, सिडको भवन, सीबीडी-बेलापूर, नवी मुंबई - ४०० ६१४.

दूरध्वनी क्र.०२२-२७५६१८२४ / हेल्प लाईन क्र. १८०० २२ २०१९
Website-https://mahaawaas.com
Email ID-directoriayruralhousing@gmail.com

जा.क्र./कावि/तक्रार/PMAY-G-१/८३०/२०२३ दिनांक - २२/०६/२०२३

प्रति,

प्रकल्प संचालक,
जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा, अमरावती.

**विषय : श्रीमंतांना घरकुल वाटप करणारे कर्मचारी व शासकीय अधिकारी यांचे सहकार्यानं गोरगरीब जनतेवर होत असलेल्या अन्याया संदर्भात कार्यवाही होणे बाबत अन्यथा दि.१४ ऑगष्ट पासुन विभागीय आयुक्तालय अमरावती येथे उपोषणास बसणे बाबत.**

संदर्भ : श्री. चंद्रशेखर नामदेव मेहरे यांचेकडील दि.२२.०६.२०२३ रोजीचा तक्रार अर्ज.

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये, श्री.चंद्रशेखर नामदेव मेहरे (पत्रकार) तालुका प्रतिनिधी दैनिक महाराष्ट्र संकल्प व अन्य ११ उपोषण कर्ते व गावकरी यांचेकडील तक्रार अर्ज या कार्यालयास प्राप्त झाले असून सोबत जोडून पाठविण्यात येत आहे.

या अनुषंगाने आपल्या स्तरावर नियमोचित कार्यवाही करुन, केलेल्या कार्यवाहीचा अहवाल अर्जदारास परस्पर कळविण्यात यावा व त्याची एक प्रत या कार्यालयास सादर करावी, ही विनंती.

सोबत - वरिलप्रमाणे

(नीलेश काळे)
उपसंचालक
राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण
महाराष्ट्र राज्य

**प्रत** :- १. मा. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, अमरावती यांना माहितीस्तव.
२. मा.उप आयुक्त (विकास), विभागीय आयुक्त कार्यालय, अमरावती यांना माहिती व कार्यवाहीस्तव.
३. अवर सचिव, ग्राम विकास विभाग, बांधकाम भवन यांना माहितीस्तव.

लिपिक
ग्राम विकास विभाग
बांधकाम भवन
२५, मर्झबान रोड, फोर्ट,
मुंबई ४०० ००१

विषय :-

श्रीमंतांना घरकुल वाटप करणारे कर्मचारी व शासकीय अधिकारी यांचे सहकार्याने गोरगरीब जनतेवर होत असलेल्या अन्याया संदर्भात कार्यवाही होणे बाबत अन्यथा दि. १४ ऑगस्ट पासुन विभागीय आयुक्तालय अमरावती येथे उपोषणास बसणे बाबत.

अर्जदार तक्रार कर्ता :- चंद्रशेखर नामदेव मेहरे (पत्रकार) तालुका प्रतिनिधी दैनिक महाराष्ट्र संकल्प व अन्य ११ उपोषण कर्ते व गावकरी

गैरअर्जदार : १) मा.प्रीती देशमुख जिल्हा प्रमुख अधिकारी जि.प.अमरावती
२) मा.श्री. संजय झंझाळ सहाय्यक अधिकारी जि.प. अमरावती तथा चौकशी समिती सातेगांव
३) मा.श्री. विनोद खेडकर गटविकास अधिकारी पं.स.अंजनगांव सुर्जी
४) चौकशी समिती अमरावती
५) चौकशी समिती पं.स. अंजनगांव

मा.महोदय,

प्रधानमंत्री आवास योजनेत श्रीमत व एकाच कुटूंबामध्ये लाभ देणे ग्रामसभेचा ठरावात फेरफार करणे व अनियमितता बाळगणे, संदर्भात २५ जाने.२०२३ ते २८ जाने.२०२३ पर्यत आम्ही पंचायत समिती अंजनगांव सुर्जी आमरण उपोषण केले होते. हे उपोषण गैर अर्जदार : १) यांनी लेखी दिल्या प्रमाणे १० दिवसावत चौकशी व कार्यवाही करु असे लेखी दिली असता ६ महिने होऊन कार्यवाही झाली नाही. वरिष्ठ अधिकाऱ्यांना वाचवण्याचा प्रयत्न करीत असल्याचे लक्षात येते

१) गैरअर्जदार १) यांनी खोटी व लेखी आश्वासन दिले. उपोषण कर्त्यांनी चौकशी आमच्या समक्ष करावी असे लेखी पत्र दिले असतांना नियमाने व वेळेवर कार्यवाही न करता उपोषण करते व शासनाचा वेळ वाया गमावला तसेच कार्यवाही करतांना, अधिकाऱ्यांना वाचविण्याचा पुरेपुर प्रयत्न करीत असल्याचे लक्षात येते.

२) गैरअर्जदार २) यांनी समिती सदस्य यांच्या संगनमताने उपोषनाचे मुख्य मुद्दे वगळुन उपोषण करते व शासनाची फसवणुक केली सदर प्रकरणात कोण दोषी आहे गैरअर्जदार १) व २) यांना माहिती असतांना आम्हाला याची माहिती देण्यात आली नाही. उलट आम्हाला गैरअर्जदार ३) यांच्या कार्यालयात आजपर्यंत चकरा मारण्यास भाग पाडले १) अध्यक्ष वानखडे डेटा डाटा एंट्री ऑपरेटर पं.स.तिवसा २) परमेश्वर वानोडे स्था.अ.सहा.प.स.दर्यापूर ३) प्रल्हाद तेलंग प.स. भातकुली ४) चेतन जाधव गट विकास अधिकारी प.स. तिवसा या समितीने तात्पुरती चौकशी अर्जदार यांच्या माघारी केली. अर्जदाराने मागणी केल्याप्रमाणे ऑफलाईन फाईल तपासणी करण्यात आपली नाही. ज्या लाभार्थ्यांना लाभ दिला त्यांच्या शेतीचे दाखले राशन कार्ड चार चाकी वाहन उपलब्धतेचे तपासणी करण्यात आले नाही. आमची व शासनाची दिशाभुल केली. कित्येक श्रीमंत लोकांची नवे ग्रामसभा करण्यात आले नाही. त्यांना लाभ कासव कोणी दिला त्या बाबत चौकशी झाली नाही. गैरअर्जदार ३) यांनी अर्जदारने तक्रार ११/११/२०२२ रोजी तक्रार केली असता दोन महिने तक्रारीवर कसलेही प्रकारची कार्यवाही केली नव्हती. अर्जदाराने वरिष्ठांकडे उपोषणाचा इशारा दिल्यानंतर गैरअर्जदार क्र. ३) यांनी चौकशी करिता १) सुनिल गवई विस्तार अधिकारी अंजनगांव सुर्जी २) रवींद्र सरोदे कनिष्ठ अभियंता बांधकाम पं.स. अंजनगांव सुर्जी ३) श्रीतीज वडनेरकर स्थापत्य अभियांत्रिकी प.स. अंजनगांव सुर्जी ४) जीवन

आठवले ग्रा.गृह निर्माण अभियंता अंजनगांव सुर्जी यांनी प्रथम अहवाल दि. ३०/११/२०२२ चौकशी अहवाल दिला १७/०१/२०२३ रोजी पुन्हा खोटा व चुकीचा अहवाल गैर अर्जदार क्र. ३) यांनी दिला यावरुन असे लक्षात येते की, गैरअर्जदार क्र. ३) दोषींना वाचवण्याचा प्रयत्न केला एकाच प्रकरणात दोन अहवाल देवून आम्हाला व शासनाला दिशाभुल केले होते. प्रथम अहवाल व चौकशी समिती अमरावतीचे दोन्ही अहवाल बरोबर होते या प्रकरणात जिल्हा चौकशी समिती खोटा अहवावल देत असल्याबाबतची माहिती व प.स. अहवाल दि. १७/०१/२०२३ अंजनगांव सुर्जी हा आमचा अहवाल बरोबर असल्याबाबत माहिती अधिकारानुसार १७/०१/२०२३ अशी माहिती गैरअर्जदार क्र. ३ यांनी दिली. १) प्रधानमंत्री आवास योजनेतील लाभार्थ्यांच्या ऑफलाईन फाईल प.स. येथुन गहाळ करण्यात आल्या फाईलची मागणी केली असता बनावट खोटया स्वरुपाचे फाईल अर्जदारास दाखविण्यात आली क्र. ३) संबंधित प्रकरणामधील दोषींना वाचविण्याचे काम गैरअर्जदार क्र. ३) करीत आहे. या प्रकरणातील गैरअर्जदारावर शासन परिपत्रक आवास योजनाची ४.५.३ नुसार ज्या अधिकाऱ्यामार्फत कार्यवाही अपेक्षित आहे आम्ही आपणास विनंती करतो की, दत्तर दिरंगाई कायदा २००६ मधील शासन आदेश नुसार व महाराष्ट्र नागरी सेवा शिस्त व अपील नियम १९७९ तसेच कलम १० चे १.२.३ च्या प्रमाणे दोषी आहे. यांच्यावर परिच्छेद क्र. ३ नुसार शिस्त भंग कायदा नुसार कार्यवाही कठोर करण्यात यावी व्यक्तीच्या प्रकारची नोंद गैरअर्जदार यांच्या सेवा पुस्तकात घेण्यात यावी. याबाबतचे लेखी माहिती अर्जदारास कळविण्यात यावी. जेणे करुन आमच्या न्याय व हक्का संदर्भात वरिष्ठाकडे व न्यायालयापुढे दाद मागण्यास सेपे होईल.

तसेच याप्रकरणात आम्हाला न्याय नाही मिळाल्यास आमचा मतदार व शासकीय कार्यक्रमात बहिष्का राहील १४ ऑगस्ट २०२३ पासून आम्ही मा. विभागीय आयुक्त यांच्या कार्यालयासमोर काळे झेंडे लावू उपोषणास बसणार याची नोंद घ्यावी आम्ही पुन्हा विनंती करतो की, आंपणास विनंती करतो की हे प्रकरण न्या प्रविष्ठ असल्याने यावरप चौकशी व कार्यवाही व्हावी.

दि. 22-6-23

सहपत्र

१) उपोषणातील मुख्य मुद्दे प्रत ३
२) प्रकल्प अधिकारी यांचे लेखी आश्वासन प्रत ३
३) प्रसार माध्यम प्रती ३
४) चौकशी अहवाल प्रत (प्रमुख मुद्दे वगळुन दिलेली)
५) ऑटो जनरेट लिस्ट शासन स्थरावर कुणी तयार केली

आपला विश्वासू

(चंद्रशेखर नामदेव मेहरे ता.प्र.दै.म.संकल्प